# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः08.08.2024** **वारःगुरुवार**

---

1. नवीन शैक्षणिक धोरणानं भारतीय शिक्षण व्यवस्थेत बहुशाखीय दृष्टीकोन आणला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. बांग्लादेशचे नवे पंतप्रधान म्हणून नोबेल पुरस्कार विजेते डॉ. मोहम्मद युनूस यांचा आज शपथविधी
3. अर्थसंकल्पाला मान्यता मिळाल्यानंतर देशातील अर्थसंकल्पविषयक प्रक्रिया पूर्ण
4. पॅरिस ऑलिंपिकमध्ये अपात्र ठरल्यानंतर भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाट ची निवृत्तीची घोषणा आणि
5. जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश,उत्तराखंड आणि राजस्थान मध्ये येत्या 7 दिवसात जोरदार पावसाचा अंदाज

**<u>राष्ट्रपती</u>**

नवीन शैक्षणिक धोरणानं भारतीय शिक्षण व्यवस्थेत बहुशाखीय दृष्टीकोन आणला आहे असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. न्यूझीलंडमध्ये आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत राष्ट्रपती बोलत होत्या. शैक्षणिक अभ्यासक्रमात माओरी संस्कृतीचा समावेश केल्याबद्दल त्यांनी न्यूझीलंड सरकारची प्रशंसा केली. तत्पूर्वी न्यूझीलंडचे राष्ट्राध्यक्ष डेम सिंडी किरो यांनी वेलिंग्टन इथं होंगी पारंपरिक पद्धतीनं राष्ट्रपती मुर्मू यांचं समारंभूर्वक स्वागत केलं. आज राष्ट्रपती न्यूझीलंडचे उपपंतप्रधान विन्स्टन पीटर्स यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

**<u>निर्मला सीतारामन</u>**

करविषयक कायदे आणि प्रक्रियांचं सुलभीकरण करून त्याद्वारे देशाची प्रगती आणि रोजगार निर्मितीला चालना देण्याचा सरकारचा दृष्टिकोन असल्याची ग्वाही अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी काल लोकसभेत दिली. अर्थ विधेयक 2024  वरच्या चर्चेला त्या उत्तर देतांना त्या बोलत होत्या. गेल्या दशकात कर रचनेत आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. करांमध्ये भरमसाठ वाढ न करता यात सुलभीकरण आणलं आहे. यामुळे पारदर्शकता वाढली आहे, असंही त्या म्हणाल्या. मध्यमवर्गावरचं कराचं ओझं वाढल्याचा दावा त्यांनी फेटाळून लावला. या उलट, वजावटीत सुधारणा करून मध्यमवर्गाला दिलासा देण्यात आल्याचं त्या म्हणाल्या. अर्थसंकल्पाला मान्यता मिळाल्यानंतर अर्थसंकल्पविषयक प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**<u>पतधोरण</u>**

रिझर्व्ह बँक आज द्वैमासिक पतधोरणाचा, या आर्थिक वर्षातला तिसरा आढावा प्रसिद्ध करेल. पतधोरण विषयक समितीची बैठक गेले दोन दिवस सुरू असून रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकान्त दास रेपो दरात काही बदल करणार का तेच ठेवणार हे आज जाहीर होईल. रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी 2023 पासून व्याज दरात कोणतेही बदल केलेले नाहीत.

**<u>पोटनिवडणूक</u>**

देशातल्या 9 राज्यांतल्या 12 जागांसाठी होणाऱ्या राज्यसभेच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम काल निवडणूक आयोगानं जाहीर केला. राज्यातल्या 2 जागांचा यात समावेश आहे. या पोटनिवडणुकीसाठी या महिन्याच्या 14 तारखेला अधिसूचना जारी होईल. 22 तारखेला अर्जांची छाननी होईल. 3 सप्टेंबरला मतदान होणार आहे. राज्यात खासदार उदयनराजे भोसले आणि पियुष गोयल लोकसभेवर निवडून गेल्यामुळे दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे.

**<u>मंत्रीमंडळ</u>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या महाराष्ट्र मंत्री मंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरण-2024 ला मान्यता देण्यात आली. पुढच्या 10 वर्षांचा विकास लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या धोरणामुळे राज्यात सुमारे 5 लाख इतकी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. तसंच यातून सुमारे 30 हजार 573 कोटी उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. यामध्ये नवी मुंबई - पुणे क्षेत्रात 2 हजार एकर जागेवर आंतरराष्ट्रीय (मेगा) लॉजिस्टिक हब तयार करण्यात येणार असून विविध ठिकाणी मध्यम आणि लघु केंद्रं उभारली जातील. या सर्व केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्याचं नियोजन आहे.

या बैठकीत काल अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. वैनगंगा- नळगंगा या महत्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पाला काल झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातल्या शेतीला समृद्ध करणारा हा प्रकल्प आहे. यासाठी 87 हजार 342 कोटी 86 लाख रुपये खर्च होणार असून पावणेचार लाख हेक्टर क्षेत्रावर सिंचन होणार आहे. राज्यातल्या अल्पसंख्याक बांधवांचं मागासलेपण दूर करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'अल्पसंख्याक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय'ची स्थापना करण्याचा निर्णय काल बैठकीत घेण्यात आला.

**<u>इस्रो</u>**

भारतीय स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं आगळावेगळा मार्ग निवडला आहे. इस्रो या दिवशी पृथ्वी निरीक्षण उपग्रह अवकाशात सोडणार आहे. एका छोट्या आणि कमी खर्चाच्या वाहकाचा यासाठी वापर केला जाणार असून 15 ऑगस्ट रोजी सकाळी हे प्रक्षेपण होईल. या नव्या वाहकासाठी हे चाचणी प्रक्षेपण असणार आहे.

**<u>बांग्लादेश</u>**

बांगलादेशात आज नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकारचा शपथविधी होणार असल्याचं बांग्लादेशचे लष्कर प्रमुख जनरल वकार-उज-जमा यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. मंत्रिमंडळातील सर्व नेत्यांची अजून नावं निश्चित झाली नसली तरी 15 जण या सरकारचे सल्लागार म्हणून शपथ घेणार असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. येत्या 3 ते 4 दिवसात देशातील परिस्थिती नियंत्रणात येईल अशी आशा व्यक्त करुन हिंसक घटनांमधील दोषींवर लवकरच कडक कारवाई करण्यात येईल असं ते म्हणाले.

**<u>ब्रिटन, इजिप्त- इशारा</u>**

ब्रिटन आणि इजिप्तनं आपल्या विमान कंपन्यांना इराण आणि लेबाननची हवाई हद्द टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. हमासच्या म्होरक्याची अलीकडेच हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर या भागात तणाव वाढला आहे. अनेक देशांनी इस्रायल आणि लेबानन जाणाऱ्या विमानसेवा रद्द केल्या असून इतर उड्डाणांसाठी इराण आणि लेबाननची हवाई हद्द वापरू नये, असं सांगितलं आहे.

**<u>राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार</u>**

राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार समारंभात इस्रोच्या चंद्रयान 3 मोहीमेत सहभागी चमूला त्यांच्या अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार दिला जाणार आहे. केंद्र सरकारनं नुकतीच 33 व्या राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारांची घोषणा केली. भारतीय विज्ञान संस्थेचे माजी सचिव प्रोफेसर जी. पद्मनाभन यांना जैविक विज्ञान क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी विज्ञान रत्न पुरस्कार दिल जाणार असून विज्ञान श्री पुरस्कारासाठी आनंदरामकृष्णन सी, उमेश वार्ष्णेय, भीम सिंह, आदिमूर्ति आदि, सैयद वाज अहमद नकवी, संजय बिहारी आणि राहुल मुखर्जी यांची निवड करण्यात आली आहे. विज्ञान युवा पुरस्कारांसाठी डॉ. बप्पी पॉल, डॉ. अभिलाष, राधा कृष्णन महालक्ष्मी, पूरबी सैकिया, दिगेंद्रनाथ स्वैन, प्रभु राजगोपाल आणि प्रशांत कुमार यांची निवड करण्यात आली आहे. 23 ऑगस्ट ला राष्ट्रीय अंतराळ दिवसाचं औचित्य साधून हे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

**<u>पॅरिस ऑलिंपिक</u>**

पॅरिस ऑलिंपिक 2024 मध्ये आज भारतीय भाला फेक पटू नीरज चोप्रा पुन्हा इतिहास घडवण्यासाठी मैदानात उतरणार आहे. तर पुरुष हॉकी संघाची कास्य पदकासाठी स्पेन बरोबर लढत होणार आहे. त्यामुळं पॅरिस ऑलिंपिक मध्ये आजचा दिवस भारतासाठी अत्यंत महत्वाचा असणार आहे.भारतीय प्रमाण वेळेनुसार नीरज चोप्राचा सामना रात्री 11 वाजून 55 मिनिटांनी सुरू होईल. तर पुरुष हॉकी संघाचा सामना संध्याकाळी 5 वाजता होणार आहे. कुस्ती मध्ये अमन सहरावत पुरुषांच्या 57 किलो वजनी गटात तर अंशु महिलांच्या 57 किलो वजनी गटात, फ्री स्टाइल कुस्ती प्रकारात मैदानात उतरणार आहेत.

**<u>फोगाट निवृत्ती</u>**

पॅरिस ऑलिंपिक मध्ये अतिरिक्त वजनामुळे अपात्र ठरल्यानंतर निराश झालेल्या कुस्तीपटू विनेश फोगाट हिनं कुस्ती मधून निवृत्त होत असल्याचं जाहीर केलं आहे.

**<u>हवामान</u>**

देशाच्या पश्चिम, उत्तर पश्चिम तसंच मध्य आणि उत्तर पूर्व भागात या आठवड्यात हलक्या ते जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थान मध्ये येत्या 7 दिवसात जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर उत्तर प्रदेश, हरियाणा, चंदीगढ, आणि दिल्ली मध्ये काही ठिकाणी हलक्या ते जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकण, गोवा आणि गुजरात मध्ये देखील हलक्या पावसाच्या सरी बरसतील. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, सौराष्ट्र आणि कच्छ मध्ये सुद्धा पावसाचा अंदाज असून या पुढील 2 दिवसांत आसाम आणि मेघालय मध्ये काही भागात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# याबरोबरच हे बातमीपत्र संपलं, नमस्कार